# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.४५ दिनांक १५/०४/२०२१

## पालघर जिल्हयात कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मनाई आदेशाचे उल्लंघन करणा-या इसमांवर पालघर पोलीस दलाकडुन कारवाई

संपुर्ण महाराष्ट्रात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव प्रचंड वाढलेला आहे. राज्यभरात कोव्हीड-१९ चा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरिता महाराष्ट्र शासनाने दिनांक ०५/०४/२०२१ रोजी मनाई आदेश लागु केले होते. तसेच दिनांक १४/०४/२०२१ रोजी सायंकाळी ०८.०० वा.ते दिनांक ०१/०५/२०२१ रोजी सकाळी ०७.०० वा.पावेतो मनाई आदेश निर्बंधासह जाहीर करण्यात आला आहे. सदर निर्बंधाचे पालघर जिल्हयामध्ये पालन करणे कामी मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर तसेच श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांनी बिनतारी संदेशावरुन सदर आदेशान्वये कारवाई करण्याबाबत सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सविस्तर सुचना दिल्या आहेत.

सदर सुचनांचे पालन पालघर जिल्हयामध्ये अत्यंत प्रभाविपणे करण्यात येत आहे. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पालघर जिल्हा पोलीस दलाने १६ पोलीस ठाणे हद्दीमध्ये वळणचौकी, चाररस्ता, हातनदी नाका, माकुंसार, पुलनाका, पामटेंभी, माहिम, पारगाव, इंद्रप्रस्त, सरावली, एमआयडीसी नाका, खैरेफाटक, वाणगांव फाटक, पावमार्ग, सागर नाका, झाई, वेवजी, तलासरी नाका, उधवा, डहाणु नाका, नाशिक नाका, सेल्वास नाका, सायवन ओपी, चारोटी, खांडेश्वरी नाका, कुडुस नाका, पाटिल पाडा नाका, मोखाडा चौफुली इत्यादी २९ महत्वाच्या ठिकाणी नाकाबंदी लावली आहे. तसेच बाजारपेठा, रेल्वेस्थानके, बसस्टॅड, रहीवासी वस्त्या अशा गर्दीच्या ठिकाणी बंदोबस्त लावण्यात आला आहे. व मनाई आदेशाचे उंल्लघन होणार नाही याची काळजी अत्यंत परिणामकारकपणे पालघर पोलीस दलाकडुन घेण्यात येत आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधिक्षक गृह, सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी यांचेसह १६ पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, १८ पोलीस अधिकारी व २९४ पोलीस अमंलदारांनी अंत्यत प्रभावीपणे कामगिरी करुन मनाई आदेशाचे उंल्लघन करणा-या व्यक्ती, संस्था, आणि संघटना इत्यादीवर कारवाई करण्यात आली आहे.

**दिनांक ०५/०४/२०२१ रोजी ते दिनांक १४/०४/२०२१ रोजी पर्यंत मनाई आदेशाचे अनुषंगाने करण्यात आलेली कारवाई पुढील प्रमाणे**

| लग्न/हळदी समारंभ | हॉटेल/ रिसॉर्ट | दुकाने | क्रिडा स्पर्धा | बियर शॉप | इतर | एकूण दाखल गुन्हे |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १० | ७६ | १ | २ | ६४ | १५६ |

**<u>मास्क न परिधान केलेल्या १२०४ इसमांवर कारवाई</u>**

पालघर पोलीस दलाकडुन मा.जिल्हाधिकारी सो. पालघर यांचा कार्यालयीन आदेश क्र.जि.आ.व्य. पालघर/कोरोना.विषाणु/टाळेबंदी/आदेश/कावि/४७/२०२१ दि.२७/०३/२०२१ अन्वये मास्क न परिधान केलेल्या <u>१२०४</u> इसमांवर कारवाई करुन **<u>५,३९,५००/- रुपये</u>** दंड वसुल करण्यात आलेला आहे.

श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर तसेच श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांच्यातर्फे जिल्हयातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव वाढत असुन तो रोखण्याकरिता महाराष्ट्र शासनाने दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा वरीलप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.